# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र. ६०६ दिनांक २३.०७.२०२०

१. फिर्यादी पुरुष वय-४७ वर्षे, धंदा-चालक, रा.मुंबई, यांनी फिर्यादी दिली की, दि.२२/०७/२०२० रोजी रात्रौ ०१.३० वाजता फिर्यादी यांना आरोपीत दोन्ही अनोळखी इसमांपैकी एकाने दगड हातात धरुन फिर्यादीच्या डोक्यास मारुन आपखुशीने गंभीर दुखापत केली व दुस-या इसमाने कोणत्यातरी धारधार शस्त्राने फिर्यादीचे डावे हातावर जोरात मारल्याने त्यात फिर्यादीचे डाब्या हाताचे मधले बोटाचे एक पेर तोडुन दोघे इसम शिवीगाळ व दमदाटी करुन फिर्यादीचे शर्टच्या खीशातील १४० रु.व १०,०००/- किमतीचा रेडमी कंपनीचा मोबाईल जबरीने काढुन घेवुन पळुन गेले. म्हणुन **वालीव पोलीस ठाणे** गु.रजि.क्र. I ६५१/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३९७,५०४,५०६,३४ प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे

२.फिर्यादी महिला वय ५५ वर्षे, व्यवसाय-शेती, रा.ता.तलासरी, जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि. २२/७/२०२० रोजी १०.०० वाजण्याचे सुमारास फिर्यादी व साक्षीदार यांनी संभा डोंगरीपाडा येथे महेश पटेल यांच्या जमिनीत भाताची पेरणी केली असुन ते भात लागवड करीत असतांना आरोपीत यांनी हातात बांबुचे दांडके घेवुन येवुन या जागेत भाताची लागवड का करता असे बोलुन फिर्यादी व साक्षीदार यांना बांबुच्या दांडक्याने मारहण करुन गंभीर दुखापती केल्याने त्यांना प्रथम ग्रामीण रुग्णालय तलासरी व नंतर साक्षीदार यांना अधिक उपचाराकरीता वापी येथे ॲडमीट केले आहे म्हणुन **तलासरी पोलीस ठाणे** गु.रजि.क्र. I १७०/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३२६,३४ प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

३. फिर्यादी पुरुष वय ३५ वर्षे, व्यवसाय नोकरी (वसई विरार महानगरपालीका) रा.वसई पुर्व, ता.वसई, जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि.२२/०७/२०२० रोजी सांय ०५.१५ वा.चे सुमारास यातील फिर्यादी व साक्षीदार क्रमांक १ ते ५ असे बापा सिताराम मार्केट, आचोळेरोड नालासोपारा पुर्व येथे रोडचे कडेला लावलेले कपडयाचे चप्पलचे स्टॉल जप्त करीत असताना आरोपीत याने फिर्यादी व साक्षीदार यांना धक्काबुक्की करुन शिवीगाळी करुन वाहन क्र एम.एच ४८/बी.एम/६८४४ हिचे मध्ये जप्त केलेला माल स्टॉलधारक यांना घेवुन जाण्यास सांगुन एस.टी बस थांबवुन रोडवर ट्रॉफिक जॅम केले म्हणुन **तुळींज पोलीस ठाणे** गु.रजि.क्र. ६६१/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३५३,३४१,५०४ प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

४. फिर्यादी पुरुष वय २७ वर्षे, धंदा-नोकरी, रा.ता.तलासरी, जि.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दि.२१/०७/२०२० रोजी २२.४५ वाजताचे सुमारास आरोपीत व फिर्यादी हे आरोपीत याची मोटार सायकल नं. एम. एच. ०४- ई. झेड. ६४६ ने घरी येत होते तेव्हा आरोपीत हा मोटार सायकल चालवित

होता. यातील आरोपीत याने त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगात चालवुन घेवुन येत असताना त्यास वळणावर वळण घेता न आल्याने मोटार सायकल रोडच्या बाजुला असलेल्या गवतावर स्लीप होवुन घसरत जावुन पुलात पडली व आरोपीत व साक्षीदार हे मोटार सायकल वरुन फेकले गेल्याने फिर्यादी यांचे उजव्या हातास व डाव्या पायास गंभीर दुखापत होवुन आरोपीत मोटार सायकल चालक हा सिमेंटच्या पोलावर जावुन आदळुन त्यांचे डोकीस गंभीर दुखापत होवुन स्वतःचे मरणास कारणीभुत झाला म्हणुन **तलासरी पोलीस ठाणे** गु.रजि.क्र. १६९/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३०४ (अ), २७९, ३३७, ३३८, सह मो.वा.का. कलम १८४ प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

५. फिर्यादी परुष वय ३२ वर्षे, धंदा-ड्रायव्हर, रा. विक्रमगड ता.विक्रमगड, जि.पालघर यांनी फिर्याद दिली की, दि.२१/०७/२०२० रोजी रात्रौ २०.४५ च्या पुर्वी, खानिवडे टोल नाक्याचे पहीले २०० मिटर अंतरावर मुंबई अहमदाबाद रोडवर यातील मयत हे रोड क्रॉस करीत असतांना मुंबई बाजू कडुन अहमदाबाद जाणारे अज्ञात वाहनावरील अज्ञात चालकाने आपले ताब्यातील वाहन रोडच्या नियमाकडे दुर्लक्ष करून हजगयीने अविचाराने बेदरकारपणे चालवून रोड क्रॉस करणारे यातील मयत यास ठोकर मारुन त्यास किरकोळ व गंभीर स्वरुपाच्या जखम करणेस व त्यांच्या मृत्युस कारणीभुत होऊन अपघाताची खबर न देता पळुन गेला म्हणुन **विरार पोलीस ठाणे** गु.रजि.क्र. ६७२/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८, मो.वा.का.कलम १८४, १८७ प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

६. फिर्यादी पोलीस शिपाई गोकुल लक्ष्मण केंदे, ब.नं./२५७ नेम. वालीव पोलीस ठाणे, जिल्हा.पालघर, यांनी फिर्याद दिली की, दिनांक २१/०७/२०२० रोजी रात्री ११:३० वाचे सुमारास न्यु नवाब सिग पराठा हॉटेल सोपारा फाटा, नालासोपारा पुर्व ता. वसई, जि. पालघर येथे यातील आरोपीत हे न्युनवाब सिग पराठा हॉटेल विहीत वेळेपेक्षा जास्त वेळ सुरु ठेवुन तेथे सुमारे ८ ते १० ग्राहक त्याठिकाणी खानपान पार्सल घेण्या करीता कोणती ही काळजी न घेता तोडांस मास्क न लावता कोवीड १९ (करोना रोगाचे) संक्रमन होईल असे ग्राहकांना उभे करुन माननीय जिल्हाधिकारी सो, यांचे मनाई आदेशाचा भंग केला म्हणुन **वालीव पोलीस ठाणे** गु.रजि.क्र. ६४९/२०२० भा.दं.वि.सं.कलम १८८,२६९ सह आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ (ब) प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

७. फिर्यादी पुरुष वय ५३ वर्षे, व्यवसाय नोकरी वाहतुक नियंत्रक एस टी डेपो नालासोपारा पश्चिम, यांनी फिर्याद दिली की, दि.२२/०७/२०२० रोजी सकाळी ०६:२० वा.चे सुमारास नालासोपारा पश्चिम एस टी डेपो येथे यातील आरोपीतांनी एकत्र येवुन मोठमोठयाने आरडा ओरडा करुन आम्हाला घेतल्या शिवाय एस.टी.बस गाडया जावु देणार नाही, असे बोलुन एस.टी.बस अडवुन गोंधळ करुन करोना साथरोग च्या अनुषंगाने नियंत्रणासाठी असलेल्या शासनाच्या आदेशाचे तसेच मा.जिल्हाधिकारी पालघर यांचे कडील आदेश क्र.गृह/का.१/टे३/मनाई आदेश/एस आर/३३/२० दिनांक ३०/०६/२०२० अन्वयेच्या आदेशाचा भंग करून बस वाहतुकीची अडवणुक केली आहे म्हणुन **नालासोपारा पोलीस ठाणे** गु.र.नं । २३८/२०२० भा.दं.वि.सं.कलम १८८,२६९,२७०,३४१ प्रमाणे, गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.